**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार दिनांक २७ ऑगस्ट २०२५**

**ठळक बातम्या**

1. **१० दिवसांच्या गणेशोत्सवाला आज पासून सर्वत्र उत्साहाने सुरवात / राष्ट्रपती आणि पंतप्रधानांनी दिल्या शुभेच्छा.**
2. **विदर्भासह नागपुरात लाडक्या बाप्पाचे थाटात आगमन, पावसाची हजेरी मात्र जल्लोष कायम.**
3. **पीएम स्वनिधी योजनेच्या पुनर्रचनेला आणि कर्ज देण्याच्या कालावधीला ३१ डिसेंबर नंतर वाढविण्यास मंत्रिमंडळाची मंजुरी.**
4. **गडचिरोली जिल्हयातील भामरागड तालुक्यातील जंगलात आज पोलिसांशी झालेल्या चकमकीत चार नक्षलवादी ठार.**

-------------------------------------------

**गणेशउत्सव**

१० दिवस चालणाऱ्या गणेशोत्सवाला आजपासून सुरुवात झाली असून घरोघरी तसंच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमधे गणेश मूर्तीची प्रतिष्ठापना होत आहे. देशात आणि परदेशातही हा सण उत्साहाने साजरा केला जात आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गणेशोत्सवानिमित्त देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. या सणातून नवीन ध्येयांसह सकारात्मकतेनं पुढे जाण्याची प्रेरणा मिळत असल्याचं राष्ट्रपतींनी संदेशात नमूद केलं आहे. तर, श्रद्धा आणि भक्तिभावानं भरलेला हा पवित्र सोहळा प्रत्येकासाठी मंगलदायी ठरो. गणरायाने आपल्या सर्व भक्तांना सुख, शांती आणि उत्तम आरोग्य द्यावे, अशी गणरायाकडे प्रार्थना, असं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.महाराष्ट्रात यंदा गणेशोत्सवाला राज्य उत्सवाचा दर्जा मिळाल्यामुळे उत्साह द्विगुणित झालेला दिसत आहे.याखेरीज राजधानी दिल्ली, राजस्थान, मध्यप्रदेश, पुद्दुचेरी, कर्नाटक, आंध्रप्रदेश इथंही गणेशोत्सव वाजतगाजत सुरु झाल्याच्या बातम्या आमच्या वार्ताहरांनी दिल्या आहेत.

-------------------------------------------

**गणेशउत्सव**

नागपूर सह विदर्भात गणपती उत्सवाचं उत्साह दिसून येत आहे. अधून मधून पावसाच्या सरी बरसात असल्या तरीही गणेशभक्तांच्या उत्साहात कुठेही कमतरता

नाहीये. शहरातील आणि विदर्भातील गणपती गणेशउत्सवाचा आढावा घेतला आहे आमच्या प्रतिनिधी ने

**(व्हॉइस कास्ट - हेमांगी कुलकर्णी)**

***नागपूरच्या श्री गणेश मंदिर टेकडी नागपूर हे नागपूर वासीयांचे आराध्य दैवत असून विदर्भातील अष्टविनायका पैकी एक पौराणिक श्रध्दास्थान आहे. आज सकाळपासून बाप्पांच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे भाविकांना कोणतीही गैरसोई होणार नाही याची विशेष दक्षता घेण्यात आली आहे. याशिवाय घरगुती गणेशाची स्थापना सकाळपासून सुरु झाली असून सार्वजनिक मंडळांचे मंडप देखील बाप्पाच्या आगमनासाठी सज्ज झाले आहेत. बाप्पाची आवडती फुलं, दुर्वा आणि मोदकांसह नैवेद्यासाठी विविध पदार्थांची बाजारपेठांमध्ये रेलचेल दिसून येत आहे, गणेश मंडळांच्या ढोलपथकांचे सरावही आता शिगेला पोहोचले आहेत.विदर्भातील अन्य जिल्ह्यात देखील  गणेश उत्सव मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात येत आहे. बुलढाणा जिल्ह्यातील खामगावकरांचे आराध्यदैवत असलेला मानाचा लाकडी गणपती विशेषत्वाने सजविण्यात आला आहे. गोंदिया, अकोला, भंडारा जिल्ह्यात देखील सार्वजनिक गणपती मंडळ सज्ज असल्याचे आमच्या प्रतिनिधी ने कळवले आहे. दरम्यान नागपूर महानगरपालिकेद्वारा  पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची तयारी पूर्ण झाली असून, शहरात विविध ठिकाणी गणेशमूर्ती विसर्जनाची चोख व्यवस्था करण्यात आली आहे. घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत  श्रीगणेश मूर्तींच्या विसर्जनासाठी शहरातील २१६ ठिकाणी ४१९ कृत्रिम तलावांची व्यवस्था करण्यात आली आहे. विशेष म्हणजे यंदा मोठ्या गणेश मूर्ती विसर्जनाची गोरेवाडा, कोराडी, कच्छीवीसा येथे सोय करण्यात आली आहे. तर शहरात सोनेगाव, गांधीबाग तलाव परिसरासह विविध ठिकाणी ४१९ कृत्रिम तलावाची व्यवस्था करण्यात आली आहे.आकाशवाणी वृत्त विभागातून मी हेमांगी कुलकर्णी.***

---

**रील स्पर्धा**

राज्य सरकारनं गणेश उत्सावादरम्यान रील स्पर्धेचं आयोजन केलं आहे. या स्पर्धेत सहभागासाठी २७ ऑगस्ट ते ७ सप्टेंबरपर्यंत ऑनलाईन नावनोदणी आणि रील अपलोड करायचे आहेत. पर्यावरण संवर्धन, स्वदेशी, गडकिल्ले, संस्कृती, ऑपरेशन सिंदूर या संकल्पना मध्यवर्ती ठेवून ३० सेकंद ते ६० सेकंदापर्यंत रील बनविणे अपेक्षित आहे. स्पर्धेत विभागीय पातळी आणि राज्य पातळीवरील विजेत्यांना पारितोषिकं जाहीर करण्यात आली आहेत. महाराष्ट्र तसंच भारताबाहेरील विजेत्या गटातील स्पर्धकाला प्रथम क्रमांकासाठी एक लाख रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ७५

हजार रुपये, तृतीय क्रमांकासाठी ५० हजार रुपये आणि उत्तेजनार्थ म्हणून २५ हजार रुपये बक्षीस देण्यात येतील.

---------------------------------------------

**सोने दर**

देशांतर्गत सराफा बाजारात आज बुधवार गणेश चतुर्थीच्या दिवशी दरात वाढ दिसून आली आहे. किमतींमध्ये वाढ झाल्याने देशातील बहुतांश सराफा बाजारात आज २४ कॅरेट सोने १,०२,४४० रुपये ते १,०२,५९० रुपये प्रति १० ग्रॅम या दरम्यान व्यवहार करत आहे. त्याचप्रमाणे २२ कॅरेट सोने आज ९३,९०० रुपये ते ९४,०५० रुपये प्रति १० ग्रॅम या दराने विकले जात आहे.

---------------------------------------------

**विज्ञान जिज्ञासा २०२५-२६**

प्रा. राजेंद्रसिंह सायन्स एक्सप्लोरेटरी नागपूर यांच्या वतीने प्रा. व्ही. जी. भिडे स्मृती आंतरशालेय विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धा ‘विज्ञान जिज्ञासा २०२५-२६’ च्या दुसऱ्या पर्वाची घोषणा करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक जिज्ञासा आणि चिकित्सक विचारसरणी विकसित करण्याच्या उद्देशाने आयोजित ही स्पर्धा ८ सप्टेंबर रोजी सकाळी ११.३० ते दुपारी ३.३० या वेळेत भारती कृष्ण विद्या विहार, सीबीएसई स्कूल, तेलंगखेड़ी होणार आहे. ही शाळा मागील वर्षीची विजेती असून यंदाच्या स्पर्धेची यजमान संस्था आहे.

---------------------------------------------

**पीएम स्वनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत "पंतप्रधान स्ट्रीट व्हेंडर्स आत्मनिर्भर निधी (पीएम स्वनिधी) योजनेच्या ३१ डिसेंबर २०२४ नंतर कर्ज देण्याच्या कालावधीची पुनर्रचना आणि विस्तार" याला मंजुरी देण्यात आली आहे. कर्ज देण्याचा कालावधी आता ३१ मार्च २०३० पर्यंत वाढविण्यात आला आहे. या योजनेचा एकूण खर्च ७ हजार ३३२ कोटी रुपये आहे. पुनर्रचित योजनेचे उद्दिष्ट ५० लाख नवीन लाभार्थ्यांसह १.१५ कोटी लाभार्थ्यांना लाभ देणे हे आहे.योजनेची अंमलबजावणी गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालय आणि वित्तीय सेवा विभाग यांची संयुक्त जबाबदारी असेल. पुनर्रचित योजनेच्या प्रमुख वैशिष्ट्यांमध्ये पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यात कर्जाची रक्कम वाढवणे, दुसऱ्या कर्जाची परतफेड केलेल्या लाभार्थ्यांसाठी UPI-लिंक्ड रुपे क्रेडिट कार्डची तरतूद आणि किरकोळ आणि घाऊक व्यवहारांसाठी डिजिटल कॅशबॅक प्रोत्साहने यांचा समावेश

आहे. या योजनेचा व्याप्ती वैधानिक शहरांच्या पलीकडे जनगणना शहरे, अर्ध-शहरी क्षेत्रे इत्यादींमध्ये श्रेणीबद्ध पद्धतीने विस्तारित केली जात आहे.

---------------------------------------------

**नक्षल**

छत्तीसगड राज्याचा सीमावर्ती भाग असलेल्या भामरागड तालुक्यातील कोपर्शी गावानजीकच्या जंगलात आज पोलिसांशी झालेल्या चकमकीत चार नक्षलवादी ठार झाले. मृतांमध्ये एक पुरुष आणि तीन महिलांचा समावेश आहे. २५ ऑगस्टला कोपर्शी परिसरात गट्टा दलम आणि कंपनी क्रमांक १० चे नक्षलवादी पोलिसांचा घातपात करण्याच्या तयारीत असल्याची माहिती मिळाल्यानंतर अतिरिक्त पोलिस अधीक्षक एम.रमेश यांच्या नेतृत्वात सी-६० दलाची १९ आणि केंद्रीय राखीव दल आणि जलद प्रतिसाद दलाची दोन पथके नक्षलविरोधी अभियानावर रवाना करण्यात आली होती.दोन दिवस मोहीम राबविल्यानंतर पाऊस सुरु असताना आज नक्षल्यांनी पोलिसांवर गोळीबार केला. पोलिसांनी दिलेल्या प्रत्युत्तरात चार नक्षली ठार झाले. घटनास्थळावरुन पोलिसांनी एक एसएलआर रायफल, दोन इन्सास, आणि एक ३०३ रायफल ताब्यात घेतले आहेत. ही चकमक आठ तास चालली, तसेच मृत नक्षल्यांची ओळख पटविण्याचे काम सुरु असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

---------------------------------------------

**हवामान**

येत्या काही तासात विदर्भातील नागपूर, वर्धा, भंडारा, यवतमाळ आणि चंद्रपूर जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ आणि हल्का ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान खात्याने वर्तवली आहे.

---------------------------------------------

**आर अश्विन निवृत्ती**

क्रिकेटपटू रविचंद्रन आश्विननं इंडियन प्रिमिअर लिग, आयपीएलमधून निवृत्ती जाहीर केली आहे. समाजमाध्यमावरील संदेशात आश्विवननं निवृत्तीचा निर्णय जाहीर केला. आयपीएल स्पर्धेत १८७ बळी घेणारा आश्विन पाचवा गोलंदाज ठरला होता. स्पर्धेत आतापर्यंत आश्विन रायजिंग पुणे सुपरजायंट, दिल्ली कॅपिटल्स, राजस्थान रॉयल्स, पंजाब किंग्ज आणि चेन्नई संघाकडून खेळला आहे.

---------------------------------------------

**लोककला महोत्सव**

भांडेवाडी रेल्वे स्टेशन रोड, हनुमाननगर इथं  जनजागृती कलंगी शाहिर मंडळ, मोहाडी आणि पंचरंगी निशाण खडी गंमत, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने

‘लोककला महोत्सव’ दिमाखात पार पडला. या प्रसंगी खडी गंमत, डायका, भजन यांसह विविध लोककलांचा मनमोहक आस्वाद रसिकांना मिळाला.या महोत्सवात ज्येष्ठ व श्रेष्ठ शाहिरांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

---------------------------------------------